# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 06/07/2020 (सोमवार)
(सकाळ)

### रेती चोरी करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 15 किमी अंतरावर गुमथळा शिवार येथे दिनांक 04/07/2020 चे 23.15 वा. ते 23.55 वा. दरम्यान एमच–40/एन–6876 क्रमांकाचा ट्रकचा चालक आरोपी क्र– 1) राहुल हरिशचंद्र शहारे, वय 36 वर्ष, रा. एरिकेशन कॉलनी गुमथळा यांने त्याचा ट्रक मालक आरोपी क्र. 2. याच्या सांगण्यावरून त्याच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या 2 ब्रास रेती किं. 6,000/– रू. रेती भरून वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण 3,06,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस नाईक मनिराम भुरे यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 379, 109 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा मनोहर जंगवाड 8805027102 हे करीत आहे.

### विनयभंग

पो.स्टे. बोरी :– दि. 05/07/2020 चे 16.00 वा. दरम्यान फिर्यादी यांची 15 वर्षीय पिडीत मुलगी हि घरी एकटी हजर असतांना आरोपी नामे– प्रफुल रामुजी धुर्वे, वय 30 वर्ष, रा. जुनीवस्ती याने तिच्या घरी अनाधिकृतपणे प्रवेश केले. यानंतर आरोपीने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 354 (ड),452,323 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि आरती उघडे या करीत आहे.

### फसवणुक

पो.स्टे. अरोली :– अंतर्गत अरोली टाऊन येथे दिनांक 28/06/2020 चे दिनांक 29/06/2020 चे 14:00 वा. दरम्यान फिर्यादींचा मुलगा नामे– संकेत सुनिल अडगुळकर, वय 16 वर्ष, रा. अरोली याने ॲमेझॉन ॲपवर जावुन नविन मोबाईल खरेदी करण्यासाठी साईट ओपन केली. यानंतर संकेत अडगुळकर याने कि. 15,999/–रु. ऑनलाईन पेमेन्ट केले, ते पेमेन्ट अयशस्वी झाले. त्याच दिवशी दुसरे ट्रॉन्झेक्शन केले व फिर्यादीचे खात्यातुन 12,899/–रु. डेबिट झाले व 29/06/2020 रोजी 1,12,404/–रू. अवैद्य मार्गाने काढण्यात आले. त्यापैकी 38,998/–रु. परत रिफंड झाले व 73,404/–रु. फिर्यादीचे खात्यातुन अवैद्यरित्या काढुन घेत अज्ञात आरोपीने फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सौ शिल्पा सुनिलराव अडगुळकर, वय 40 वर्षे, रा. अरोली यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम 420 भादंवि. सहकलम 66(इ) आयटी ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री सोनवणे पो स्टे अरोली 8805730362 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर